# प्रेस नोट

साकी जि.धुळे

दिनांक :- ११/०९/२०१८

**लोकसेवक (१) प्रदीप हरीभाऊ साबळे, वय-५७ वर्षे, धंदा-सहा. लेखाधिकारी वित्त विभाग (वर्ग-३) आणि (२) नंदकुमार रामदास खैरनार, वय-४५ वर्षे, कनिष्ठ सहा. शिक्षण विभाग (वर्ग-३), दोन्ही नेमणुक पंचायत समिती कार्यालय साकी जि. धुळे यांनी २,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याने अटक**

यातील तक्रारदार हे जिल्हा परीषद शाळेत उपशिक्षक असुन त्यांचा सन २०१७ मध्ये अपघात झाल्याने त्यांचे वैद्यकीय रजेचे वेतन (पगार) बिल व रजा मंजुरीसाठी सन २०१७ मध्ये पंचायत समिती, साकी येथील कार्यालयास प्रलंबित असल्याने त्यांचे रजा कालावधीतील वेतन (पगार) मिळणे संदर्भात पंचायत समिती, साकी येथे शिक्षण विभागात गेले असता, लिपीक श्री.खैरनार व अकाऊटंट श्री.साबळे हे वैद्यकीय रजेचा पगार बिल काढुन देण्याच्या प्रक्रियेसाठी तक्रारदार यांचेकडे दोघेही ३,०००/- रू. लाचेची मागणी करीत असुन गेल्या ८ महिन्यांपासुन नमुद प्रकरण पैशांसाठी प्रलंबित ठेवले होते. मात्र तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि.३१/०८/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धुळे येथे लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.३१/०८/२०१८ रोजी पंचायत समिती साकी येथे पडताळणी केली असता, लिपीक श्री.खैरनार व अकाऊटंट श्री.साबळे यांनी तक्रारदार यांचे अपघात वैद्यकीय रजेचे पगार बिल काढुन देण्यासाठी तडजोडीअंती २,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द सापळा लावण्यात आला होता. नमुद दोन्ही लोकसेवक यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तद्नंतर आज दि.११/०९/२०१८ रोजी लोकसेवक (१) प्रदीप हरीभाऊ साबळे, वय-५७ वर्षे, धंदा-सहा. लेखाधिकारी वित्त विभाग यांना पंचायत समिती कार्यालय साकी येथुन आणि (२) नंदकुमार रामदास खैरनार, वय-४५ वर्षे, कनिष्ठ सहा. शिक्षण विभाग जिल्हा परीषद कार्यालय धुळे येथुन ताब्यात घेण्यात आले असुन, त्यांचेविरुध्द साकी पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारणा) कायदा सन २०१८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, धुळे विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या सरकारी अधिकारी / कर्मचारी यांचे बद्दल काही तक्रार असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे कार्यालयाशी संपर्क साधावा.

**दुरध्वनी क.** :- ०२५६२-२३४०२० **टोल फ्री क.** :- १०६४
**भ्रमणध्वनी क.** :- ९८९२७७१७७२
**ईमेल** :- dyspacbdhule@gmail.com व dyspacb@mahapolice.gov.in
**वेबसाईट** :- www.acbmaharashtra.gov.in मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net
**फेसबुक पेज** :- www.facebook.com / MaharashtraACB

पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे

( शत्रुघ्न माळी )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे

Scanned by CamScanner